N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** शिवाजी नगर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0182 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/04/2024 20:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 08/04/2024
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/04/2024
**Time From (वेळेपासून):** 13:35 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:32 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 22/04/2024 **Time (वेळ):** 19:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 026
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/04/2024 19:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.3 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** महाराश्ट्र राज्य परिवहन महामंड, लातूर आगार

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): पांडुरंग दत्तात्रय अंकुश

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | मुपो पोहरेगाव, रेणापुर जि लातूर ,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | चालक बच न ,20689,महाराश्ट्र राज्य परिवहन महामंड,लातूर,लातूर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9922777427

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बालाजी वसंतराव अडसुळे | | | 1. दत्ता हस्पीटलजवळ,कन्हेरी रोड, क्वाईल नगर,,लातूर ,लातूर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रूपये दराच्या 4 भारतीय चलनी नोटा | 2,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
मी पांडुरंग दत्तात्रय अंकुष, वय 43 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-चालक बॅच नंबर 20689, नेमणुक महाराश्ट्र राज्य परिवहन महामंडळ, लातूर आगार, रा. मु.पो. पोहरेगाव ता. रेणापुर जि. लातूर
मो.नं.9922777427
समक्ष फिर्याद देतो की, मी दिनांक 08/04/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथील पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब व पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांना समक्ष भेटुन माझी एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणीची माझी तक्रार असल्याचे तोंडी सांगितली. त्यावरुन पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी लागलीच दोन षासकीय पंचाना बोलावुन घेतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मला सापळा पथकातील सदस्य व पंचांची ओळख करून देवुन त्यांचे समक्ष माझे नाव, गाव विचारले असता मी त्याना माझे नाव वरीलप्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली, ती खालीलप्रमाणे.
" मी वरील ठिकाणचा राहणारा असुन महाराश्ट्र राज्य परिवहन महामंडळ, लातूर आगार, लातूर येथे चालक पदावर काम करतो. माझे घरी लग्नकार्य असल्याने व घराचे बांधकाम असल्याने मी सन 2024-2025 वर्शातील 15 दिवस अर्जित रजा व 15 दिवसाचे रजा रोखीकरण/इनकॅषमेंट मंजुर होणेकरीता दि.20/03/2024 रोजी आमचे आगार व्यवस्थापक यांचेकडे जावुन अर्ज दिला होता. सदर रजा मंजुरीचे अनुशंगाने मी दि.05/04/2024 रोजी आगार व्यवस्थापक यांचेकडे गेलो असता, त्यांनी मला तुमचा अर्ज मंजुर केला आहे, पण त्याकरीता तुम्हाला आमच्याकडं बघावं लागेल असे म्हणुन माझी रजा मंजुर केल्याचा मोबदला म्हणुन माझेकडे 2,000/-रू. लाचेची मागणी केली आहे. आगार व्यवस्थापक श्री अडसुळे यांनी मागीतलेली रक्कम ही लाच असल्याचे माझी खात्री झाल्याने मी त्यांचेविरुध्द तक्रार देण्यासाठी आलो आहे. संबंधीत लोकसेवक यांना लाच देण्याची माझी इच्छा नसुन माझा त्यांचेषी कसलाही आर्थिक तथा देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला नाही, बाकी नाही अथवा माझे त्यांचेषी काही वैर नाही.'' अषा आषयाची मी दिलेली तक्रार सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब व पंचांनी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्षUया केल्या आहेत.
पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने लातूर आगारातील आगार व्यवस्थापक श्री अडसुळे यांनी मला माझ्या वर नमुद केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन लाचेची मागणी केली आहे अगर कसे? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन, ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरीकार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या.
त्यानंतर पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मला योग्य त्या सुचना देवून पोकॉ/1400 कच्छवे यांचे मार्फतीने दि.08/04/2024 रोजी 13.35 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळ्यात अडकावुन लातूर आगार व्यवस्थापक अडसुळे बसत असलेल्या ठिकाणी जाण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 कांबळे असे लातूर आगारातील आगार व्यवस्थापक कक्षासमोर जावुन पांढUया रंगाचा फुल बाहयाचा षर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती हे आगार व्यवस्थापक श्री अडसुळे असल्याचे पंचास ईषा-याने सांगुन त्यांची पंचासमक्ष भेट घेतली असता त्यांनी माझ्◌ा वरील नमुद कामाच्या अनुशंगाने पंचासमक्ष आगार व्यवस्थापक अडसुळे यांचेषी समोरासमोर चर्चा केली. चर्चे दरम्यान आगार व्यवस्थापक अडसुळे मला म्हणाले... दिलाय का ती... अर्ज दिला का? त्यावर मी म्हणालो... दिला... त्यावर आगार व्यवस्थापक अडसुळे म्हणाले...किती तारखेपर्यंत हाय... सहा दिवस झालं... सात दिवस...त्यावर मी म्हणालो... भेटा म्हणलतो म्हणुन आलतो... अजुन भेटतो.... त्यावर

आगार व्यवस्थापक अडसुळे म्हणाले... काय अं...काय काम काढले.... त्यावर मी म्हणालो... काम कहाय सर... घराचं होतं... लग्न झालं... त्यावर आगार व्यवस्थापक अडसुळे म्हणाले... लग्न होतं... बर झाल का?...त्यावर मी म्हणालो... अं... झाल सगळं व्यवस्थीत झालं... भेटा म्हणालाव म्हणुन... येवु बँकेत जावुन सर... त्यावर आगार व्यवस्थापक अडसुळे म्हणाले...जावुन या की जावा... त्यावर मी म्हणालो... किती आणु... त्यावर आगार व्यवस्थापक अडसुळे म्हणाले... बघा तुम्ही तुम्ही विचारू नका... त्यावर मी म्हणालो... तुमच्या पुढ जात नाही.. त्यावर आगार व्यवस्थापक अडसुळे म्हणाले...तुम्हाला तर माहित्याय की... आपलं नसतय तसलं काय... बघा जावुन या जावा... त्यावर मी म्हणालो... किती आणु.... त्यावर आगार व्यवस्थापक अडसुळे म्हणाले... तुमच्या इच्छेने बघायचं कहाय ती... अं...त्यावर मी ठिक हाय... आलोच एक पाच मिनीटात जावुन आलो.... असे म्हणुन मी व पंच क्रमांक 1 कांबळे असे तेथुन निघून बाहेर येवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी ला.प्र.वि. कार्याल, लातूर येथे 13○:47 वाजताचे सुमारास आलो○○ असता पोकॉ कच्छवे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. पोलीस निरीक्षक पुन्नी साहेब यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 कांबळे यांना लाचेची मागणीच्या अनुशगाने माझ्यात व आगार व्यवस्थापक अडसुळे यांच्यात काय बोलणे झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 कांबळे यांनी मी वर नमुद केल्याप्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वांनी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कच्छवे○ यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व आगार व्यवस्थापक अडसुळे यांच्यात झालेले संभाशण ऐकुन ते पंच क्रमांक 1 कांबळे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री केली. वरील संभाशणावरुन आगार व्यवस्थापक अडसुळे यांनी पंचासमक्ष माझेकडे माझी रजा मंजुर केल्याचा मोबदला म्हणुन बघा तुम्ही तुम्ही विचारु नका... तुमच्या तुमच्या इच्छेने करायचं कहाय ती...अं... असे म्हणाले. परंतु आगार व्यवस्थापक अडसुळे यांचेकडुन लाचेची मागणी झाली परंतु संभाशणादरम्यान मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेचा निश्चीत बोध होत नसल्याने व पाच मिनीटात जावुन आलो असे आगार व्यवस्थापक अडसुळे यांना म्हणालो असल्याने सापळा अधिकारी, पंच व मी असे सर्वानुमते परत एक वेळेस लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक भास्कर पुन्नी साहेब यांनी मला योग्य त्या सुचना देवून पोकॉ/1400 कच्छवे यांचे मार्फतीने 13.58 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळ्यात अडकावुन लातूर आगार व्यवस्थापक श्री अडसुळे बसत असलेल्या ठिकाणी जाण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 कांबळे असे लातूर आगारातील आगार व्यवस्थापक यांचे कक्षामध्ये जावुन माझ○ी वरील नमुद कामाच्या अनुशंगाने पंचासमक्ष आगार व्यवस्थापक अडसुळे यांचेषी समोरासमोर चर्चा केली. चर्चे दरम्यान आगार व्यवस्थापक अडसुळे मला म्हणाले... तस काही नाही बर कम्पलसरी... त्यावर मी म्हणालो...नाही... तस नाही सर...गेलतो बँकेत... काहीतरी पेमेंट नाही म्हणाले होते...मुलाला एखाद्या वेळेस मी धरुन बोलावतो... किती आणु सांगा... त्यावर आगार व्यवस्थापक अडसुळे म्हणाले... बर जावु द्या... त्यावर मी म्हणालो... तसं नाही सर माझी रजा... रजा तुम्ही दिल्यामुळ काम झालं हयवका... त्यावर आगार व्यवस्थापक अडसुळे म्हणाले... करा... करा...सांगा जावा तुम्ही... आपलं काही नाही.. तुमचं तुम्ही बघायचं कहाय ती...त्यावर मी म्हणालो... माझे दोन्ही काम झाले हयवका व्यवस्थित... त्यावर आगार व्यवस्थापक अडसुळे म्हणाले...तुमचं तुम्ही बघा हिषोबानं कहाय ती...तुमचं तुम्ही हिषोबानं द्यायचं...त्यावर मी म्हणालो... सांगा तुम्ही सांगा... मी मुलाला बोलावुन घेतो... त्यावर आगार व्यवस्थापक अडसुळे म्हणाले...तसं नसतय ओ ते... सांगायचं काय असतयं.... जावा निवांत जावा तुम्ही... ड्युटीला आल्यास बघन... अं... असे म्हणाल्याने मी व पंच क्रमांक 1 कांबळे असे तेथुन निघून बाहेर येवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी ला.प्र.वि. कार्याल, लातूर येथे 14○:11 वाजताचे सुमारास आलो○○ असता पोकॉ कच्छवे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. पोलीस निरीक्षक पुन्नी साहेब यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 कांबळे यांना लाचेची मागणीच्या अनुशगाने माझ्यात व आगार व्यवस्थापक अडसुळे यांच्यात काय बोलणे झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 कांबळे यांनी मी वर नमुद केल्याप्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वांनी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कच्छवे○ यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व आगार व्यवस्थापक अडसुळे यांच्यात झालेले संभाशण ऐकुन ते पंच क्रमांक 1 कांबळे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री करुन आगार व्यवस्थापक श्री अडसुळे यांनी माझ्या वर नमुद कामासाठी माझ्याकडे तुमचं तुम्ही बघा हिषोबानं कहाय ती...तुमचं तुम्ही हिषोबानं द्यायचं... तुमचं तुम्ही बघायचं कहाय ती... जावा निवांत जावा तुम्ही... ड्युटीला आल्यास बघन... अं...असे म्हणुन स्पश्टपणे लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम मी रजेवरुन ड्युटीवर हजर झाल्यास बघतो असे सांगीतल्याने आम्ही सर्वानुमते आगार व्यवस्थापक अडसुळे यांचेविरुध्द पुढील सापळा कार्यवाही मी ड्युटीवर हजर झाल्यानंतर करण्याचे ठरवुन पोलीस निरीक्षक भास्कर पुन्नी यांनी मला, सापळा पथकातील सदस्य व पंचांना गोपनीयतेबाबत सुचना देवुन सापळा कार्यवाही तात्पुरती स्थगित

करण्यात आली.

मी दिनांक 16/04/2024 रोजी रजेवरुन कर्तव्यावर हजर झाल्यानंतर मला सलग ड्युटी लागल्याने मी आज दिनांक 22/04/2024 रोजी पुढील सापळा कार्यवाहीकरीता लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, लातूर येथे आलो असता, सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली यांनी पंच व सापळा पथकास बोलावुन घेवुन मला आगार व्यवस्थापक अडसुळे यंाना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणे बाबत कळविले असता मी आगार व्यवस्थापक यांनी माझेकडे दि.05/04/2024 रोजी भेटीदरम्यान मागणी केल्याप्रमाणे एकुण 2,000/-रू. ज्यामध्ये 500/-रुपये दराच्या 04 भारतीय चलनी नोटा असे एकुण 2,000/-रुपये समक्ष हजर केल्या. त्यावेळी पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी मला व पंचाना अॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोकॉ/1687 जाधव यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या अंगातील षर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या खांद्यावरील गमजा काढुन तोंड पुसुन हातात घेणे बाबतचा सुनियोजीत ईषारा करणेबाबत सांगण्यात आले. पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या. पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांच्या सुचनेनुसार पोलीस कर्मचारी कच्छवे यांनी व्हाईस रेकॉर्डर 13ः27 वा. चालु करुन माझ्या गळयात आडकावुन दिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 कांबळे असे लातूर आगारात जावुन आगार व्यवस्थापक श्री अडसुळे यांची भेट घेवुन म्हणालो... आलो सर भेटायला.... 16 तारखेला झालो जॉईन...तुम्ही म्हणलाव होताव... कामावर आल्यास बी जमतयं... त्यावर आगार व्यवस्थापक अडसुळे म्हणाले...हं...त्यावर मी म्हणालो... हं...झाल काम झालं तुमच्यामुळं.... त्यावर आगार व्यवस्थापक अडसुळे म्हणाले... अॅडजस्ट कराव लागतय काय करावं... अॅडजस्ट केल्याषिवाय पर्याय नाही...त्यावर मी म्हणालो... तुम्ही आकडा सांगीतला नाही.... मी आणले दोन हजार रुपये...असे म्हणुन 500/-रुपये दराच्या 04 भारतीय चलनी नोटा असे एकुण 2,000/-रुपये लोकसेवक आगार व्यवस्थापक अडसुळे यांचे समक्ष धरले असता अडसुळे यांनी माझेकडुन 13.32 वाजण्याच्या सुमारास पंचासमक्ष सदरची लाचेची रक्कम ही त्यांच्या डाव्या हाताने स्वीकारुन पांढÚया रंगाच्या फुल बाहयाच्या षर्टच्या डाव्या बाजूच्या खिषामध्ये ठेवली. त्यानंतर मी नियोजीत लाचस्विकृतीचा इषारा केला. त्यानंतर लगेच पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब हे पंच क्र. 02 मंटूळे व सापळा पथकातील सदस्यासह सदर ठिकाणी आले. माझेकडील व्हाईस रेकॉर्ड पोलीस कर्मचारी कच्छवे यांचेकडे दिले ते त्यांनी घेवुन बंद केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी पंच क्रमांक 1 कांबळे यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 कांबळे यांनी समोर पांढÚया रंगाचा फुल बाहयाचा षर्ट व नेव्हीब्ल्यु रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती हे आगार व्यवस्थापक अडसुळे असुन त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ही त्यांच्या समोर स्विकारुन पांढÚया रंगाच्या फुल बाहयाच्या षर्टच्या डाव्या बाजूच्या खिषामध्ये ठेवली असलेबाबत सांगितले. मी वर सांगीतलेल्या हकीकती प्रमाणे मिळती जुळती हकीकत पंच क्रमांक 1 कांबळे यांनी सांगीतली. त्यावेळी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी त्यांचेकडील ओळखपत्र आगार व्यवस्थापक अडसुळे यांना दाखवून त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव बालाजी वसंतराव अडसुळे, वय 52 वर्षे, पद आगार व्यवस्थापक, वर्ग-2, नेमणुक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, आगार-षिवाजी चौक लातूर रा. दत्ता हॉस्पीटलजवळ, कन्हेरी रोड, क्वाईल नगर, ता.जि. लातूर असे असल्याचे सांगितले. पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी पंच क्रमांक 2 मंटूळे यांचे हस्ते लोकसेवक अडसुळे यांच्या जवळील लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 कांबळे यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरशी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्षनास आले. त्यानंतर आगार व्यवस्थापक अडसुळे यांना ताब्यात घेवुन तेथील आवष्यक ती सापळा कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पुढील कार्यवाही करणेकरीता घटनास्थळावरुन रवाना होवून लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, लातूर येथे येवुन पुढील कार्यवाही पुर्ण केली.

तरी यातील लोकसेवक बालाजी वसंतराव अडसुळे, वय 52 वर्षे, पद आगार व्यवस्थापक, वर्ग-2, नेमणुक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, लातूर आगार, लातूर रा. दत्ता हॉस्पीटलजवळ, कन्हेरी रोड, क्वाईल नगर, ता.जि. लातूर यांनी माझे सन 2024-2025 या वर्षातील 15 दिवस अर्जित रजा व 15 दिवसाचे रजा रोखीकरण/इनकॅषमेंट मंजुर केल्याचा मोबदला म्हणुन, दिनांक 08/04/2024 रोजी तुमचं तुम्ही बघा हिषोबानं कहाय ती...तुमचं तुम्ही हिषोबानं द्यायचं... तुमचं तुम्ही बघायचं कहाय ती... म्हणुन लाचेची मागणी करुन 2,000/-रू. लाचेची रक्कम आज दिनांक 22/04/2024 रोजी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, लातूर आगार, लातूर येथील स्वतःचे कार्यालयात 13ः32 वा. चे सुमारास पंचासमक्ष स्वतः स्विकारली आहे. म्हणुन माझी लोकसेवक बालाजी वसंतराव अडसुळे, वय 52 वर्षे, पद आगार व्यवस्थापक, वर्ग-2, नेमणुक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, लातूर

आगार, लातूर यांचेविरुध्द कायदेशीर तक्रार आहे.
मी वर नमुदप्रमाणे सांगितलेली तक्रार ही पोकॉ जाधव यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रिंट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली. ती मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

DILIP DIGAMBAR SAGAR(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

पी.डी. अपराधी

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): DILIP DIGAMBAR SA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

पो.ठाणे अंमलदार
पो.स्टे.शिवाजी नगर,लातूर